पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे - ३३
दुरध्वनी क्र. ०२०- २७३५०५५५
ई मेल आयडी – cp.pcpc-mh@gov.in

जा.क्र./विशा/प्रशा/२५६६२४/२०२३, पिंपरी चिंचवड, दि.१० .०७.२०२३

**मनाई आदेश**

**विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३)प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश.**

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरात जनतेच्या विविध मागण्यांसाठी विविध राजकिय पक्ष, सामाजिक संघटना, मोर्चे, धरणे, निदर्शने, उपोषणासारखे आंदोलने बंद पुकारणे इत्यादी प्रकारचे आंदोलने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिनांक ११.०७.२०२३ रोजी जागतीक लोक संख्या दिन, दिनांक १२.०७.२०२३ रोजी संत तुकाराम महाराज पालखी पंढरपुर वरुन परत देहु, व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी पंढरपुर वरुन परत आळंदी, दिनांक १३.०७.२०२३ रोजी वीर शिवा काशिद स्मृतीदिन, दिनांक १४.०७.२०२३ रोजी गोपाळ गणेश आगरकर जन्मदिन व नित्यानंद स्वामी पुण्यतिथी, दिनांक १५.०७.२०२३ रोजी संत नामदेव महाराज पुण्यतिथी, दिनांक १६.०७.२०२३ रोजी संत सावता महाराज पुण्यतिथी, दिनांक १७.०७.२०२३ रोजी आषाढी अमावास्या (गटारी अमावास्या), दिनांक १८.०७.२०२३ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतीदिन, दिनांक २०.०७.२०२३ रोजी मुस्लिम मोहरम मासारंभ, दिनांक २३.०७.२०२३ रोजी लोकमान्य टिळक जयंती असे सन, उत्सव, जयंती, पुण्यातिथी तसेच दिन इत्यादी विविध कारणांमुळे तसेच अतिक्रमण हटवण्याच्या कारवायांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे.

२/- त्याअर्थी, माझी खात्री झाली आहे की, पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१),(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश करणेस पुरेसे व सबळ कारण आहे.

३/- त्याअर्थी, **मी डॉ.संजय शिंदे, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड** वर नमूद अ.नं. १ व २ च्या आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात **दिनांक ११.०७.२०२३ रोजी ००.०१ वा.पासून ते दिनांक २४.०७.२०२३ रोजी २४.०० वा. पर्यंत या १४ दिवसांसाठी** खालील नमूद केलेली कृत्ये करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.

१. कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बरोबर नेणे.
२. दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने तसेच काचेचे तुकडे व काचेच्या रिकाम्या बाटल्या बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.
३. शस्त्रे, सोटे, भाले, चाकु,सुरा,कोयता, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात
४. येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे.
५. कोणत्याही इसमाचे चित्राचे,प्रतिकात्मक प्रेताचे,पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे.
६. मोठ-मोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे.
७. यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपुर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही चित्रस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालीत आहे.
८. ज्यायोगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) विरूध्द वर्तन करणे.

४/- महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणुक काढणेस बंदी घालीत आहे.

५/- वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही.

६/- सदरचे आदेशाची जाहिररीत्या ठळक प्रसिध्दी दयावी.

७/- या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक १० .०७.२०२३ रोजी दिलेला आहे.

ठिकाण :- पिंपरी चिंचवड.

दिनांक :-१० .०७.२०२३

सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

(डॉ.संजय शिंदे)

पोलीस सह आयुक्त,पिंपरी चिंचवड